# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४१०/२०२३ दिनांक – ३०/११/२०२३

## Credit Card Reward Point द्वारे फसवणूक रक्कम रु.७,३५,०००/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणे यांना यश !!

मिरा-भाईंदरवसई-विरार पोलीस आयुक्तालयातील भाईंदर परिसरातील श्री.मनिष रा.भाईंदर,मिरारोड यांची अनोळखी मोबाईल धारकांकडुन त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यात **Reward Point** जमा करण्याचे सांगुन क्रेडिट कार्डाची माहिती घेवुन ७,३५,०००/- रु ची फसवणुक झाल्याबाबत दिनांक २८/११/२०२३ रोजी सायबर पोलीस ठाणे येथे (सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक-२८४०-बी/२०२३ दि.२८/११/२०२३) अन्वये तक्रार प्राप्त झाली.

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक झालेली रक्कम **Razorpay** या पेमेंट वॉलेटवर वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तात्काळ **Razorpay** या पेमेन्ट गेटवे कंपनीचे नोडल आधिकारी यांचेशी तात्काळ फोनद्वारे संपर्क साधुन व ईमेलद्वारे पत्रव्यवहार करुन तक्रारदार याचे फसवणुकीची रक्कमेचे ट्रान्झेक्शन तात्काळ थांबविण्यात आली. तसेच त्यानंतर पाठपुरावा करुन **तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम ७,३५,०००/- त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Credit Card Reward Pointसंदर्भात येणा-या कॉल्स, एसएमएस ला प्रतिसाद देवु नये.**
- **Credit Card संबंधीत माहिती कोणासही उघड करु नये.**
- **Credit Card Reward Pointसंदर्भात कोणतीही लिंक अगर ॲप मोबाईलवर प्राप्त झाल्यास ओपन करु नये.**
- **आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच तात्काळ सायबर हेल्पलाईन 1930 तसेच आपले संबंधीत बँकेशी संपर्क साधावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउनि/ प्रसाद शेनोळकर, पोअं/१२०९५ गणेश इलग, पल्लवी निकम, कुणाल सावळे, प्रशांत बोरकर, मसुब/राजेश भरकडे, सोनाली मोरे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**
**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000----**


MIRA BHAYANDAR VASAI VIRAR POLICE COMMISSIONERATE
CYBER POLICE STATION
"I Never Share OTP.
"I SEARCH GOOGLE Wisely."
"I know Making FAKE PROFILE CRIME"
"I Do not Invest My Hard Earned Money in Unregulated Plans."
"Cyber-crime is the greatest profile threat to everyone. Be aware always"
"I'm a CYBER "SAVIOUR"
"I Post decent messages on Social Media.
"At the end of the day, the goals are Simple, Safety, and Security."
"I Do Online Shopping with Reputed Website."
"Before Downloding any App I do Search and then Accept/Allow."